क्रमांक : ६०

# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

## सोमवार, दिनांक १५ मे, २०२३ / वैशाख २५, १९४५ (शके)

## लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण

**६०.** सर्व सन्माननीय विधानसभा सदस्यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानसभेचे सन २०२२ चे चतुर्थ (हिवाळी) अधिवेशन सोमवार, दिनांक १९ डिसेंबर, २०२२ रोजी विधान भवन, नागपूर येथे सुरु होऊन शुक्रवार, दिनांक ३० डिसेंबर, २०२२ रोजी संस्थगित झाले.

संस्थगित झालेल्या चतुर्थ सत्रातील एकूण २४७ स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र दिनांक ३० डिसेंबर, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले. त्यापैकी ४४ निवेदने मा.सदस्यांना टपालखणाव्दारे त्याचदिवशी वितरीत करण्यात आली होती व एकूण २०३ लक्षवेधी सूचनांची निवेदने प्रलंबित होती. त्यापैकी ५५ लक्षवेधी सूचनांची निवेदने दिनांक ३० जानेवारी, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२, क्रमांक ७ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आली आहेत. प्रलंबित १४८ लक्षवेधी सूचनांच्या निवेदनांपैकी ६१ निवेदने गुरुवार, दिनांक १६ फेब्रुवारी, २०२३ रोजी पत्रक भाग-२ व्दारे वितरीत करण्यात आलेली आहेत. आता एकूण ८७ निवेदनांपैकी ५३ लक्षवेधी सूचनांची निवेदने दिनांक १० एप्रिल, २०२३ रोजीच्या पत्रक भाग-२, क्रमांक ५८ अन्वये मा.सदस्यांना वितरीत करण्यात आली आहेत. आता एकूण ३४ निवेदनांपैकी ०६ निवेदने शाखेत प्राप्त झाली असून ती यासोबत वितरीत करण्यात येत आहेत.

**विधान भवन,**
**मुंबई,**
**दिनांक : १५ मे, २०२३**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार)**
**महाराष्ट्र विधानसभा.**

**याची प्रत :**

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
३. संगणक कक्ष (website.)

## महाराष्ट्र विधानसभा

<u>नगर विकास विभाग</u> <u>लक्षवेधी सूचना:- १७५८</u>

<u>सन २०२२ चे हिवाळी अधिवेशन</u>

**श्री. भिमराव तापकीर, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे. :-**

"राज्य शासनाने पुणे महानगरपालिका हद्दीलगतच्या गावांचा समावेश करून या गावांचा प्रशासकीय कारभार ताब्यात घेतला असतांना या गावांपैकी नऱ्हे, धायरी, शिवणे, उत्तमनगर, किरकीटवाडी, खडकवासला, नांदोशी, आंबेगाव, गुजरवाडी, मांगडेवाडी अशा सर्व २३+११ म्हणजेच ३४ गावांमध्ये पाणी पुरवठा, स्वच्छता, ड्रेनेज लाईन, रस्ते, आरोग्याशी निगडीत सोयी सुविधांचा अभाव असणे, तत्पूर्वी पुणे येथील ११ गावांचा पुणे महापालिकेत समावेश होऊन बराच कालावधी लोटला असतांना अद्याप त्या गावांचा विकास झालेला नसणे, सुविधा न देता भरमसाठ पद्धतीने तीन पट व अधिक कर आकारणी त्या गावातील नागरिकांकडून करण्यात येत असणे, पर्यायाने फुरसुंगी व देवाची उरुळीया दोन गावांनी स्वतंत्र नगरपालिकेची मागणी केली असणे व तसा निर्णय प्रगतीत असणे, समाविष्ट गावांतील आरक्षित जमिनी ताब्यात घेण्यात होत असलेल्या विलंबामुळे आरक्षित जमिनी अतिक्रमित होत असणे, आराखड्यातील रस्ते अद्याप पूर्ण झाले नसणे, नाला चॅनलिंगसह नाल्यांचे नैसर्गिक स्त्रोत बदलून बांधकामे होत असणे, याकडे होणाऱ्या दुर्लक्षतेमुळे पावसाळ्यात पूरसदृश्य परिस्थिती निर्माण होत असणे,भविष्यात वाड्या-वस्त्यांमध्ये पाणी शिरण्याची शक्यतता बळावली असणे, तसेच शहरातील पावसाचे पाणी नाल्यांमधून नदीला जाऊन मिळते. मात्र, रामनदी, वारजे, कोथरूड, मुळा-मुठा नदी, कर्वेनगर पात्रालगत भर टाकण्याचा प्रकार उघडकीस येत असणे, वारजे, भुसारी कॉलनी, बावधन, चांदणी चौक व परिसरात बांधकाम विकासकांनी नदी, नाल्यांमध्ये भर घालून अतिक्रमण करून बांधकामे केल्याचे निदर्शनास येत असणे, याकडे महापालिका प्रशासनाचे दुर्लक्ष होत असणे, पुणे सातारा रस्त्यावरील वाहनांची वाढती वाहतूक व त्यामुळे होणारी वाहतूक कोंडी या पार्श्वभूमीवर स्वारगेट ते कात्रज मेट्रो बाबत स्पष्टता येत नसणे, स्वारगेट ते कात्रज मेट्रो मार्गाचे काम जलदगतीने सुरु करण्याची आवश्यकता असणे, खडकवासला ते फन टाइम, सिंहगड रोड-राजाराम पूल मार्गे डेक्कन अशा भविष्यातील मेट्रोच्या नियोजनाबाबत निर्णय प्रलंबित असणे, महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका यांच्या स्वाक्षरीने जा.क्र.३९८ दि.१९/०५/२०१६ रोजी आपणांस धनकवडी स.नं.२९/१/२/४ चैतन्यनगर या मिळकतीचे ले-आउट मधील ओपन स्पेसवर गार्डन आरक्षण करण्याबाबत महाराष्ट्र नगर नियोजन व प्रादेशिक योजना १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये कार्यवाही पूर्ण केली असून त्यास अंतिम मान्यता मिळणेबाबत लेखी पत्रव्यवहार करण्यात आला असणे, मान्य विकास योजना आराखड्यानुसार सदर मिळकत निवासी झोन मध्ये असून मान्य विकास आराखड्यानुसार या भागात नागरिकांकरिता सार्वजनिक गार्डन (उद्यान) याचे आरक्षण नसणे, या भागात राहणाऱ्या नागरिकांचे हितासाठी मे. उच्च न्यायालयाचे आदेशानुसार ८०००.०० चौ.मी.क्षेत्राची जागा गार्डनसाठी आरक्षित करणे योग्य होणार असणे, धनकवडी स.नं.२९/१/२/४ चैतन्यनगर येथील मोकळ्या जागेवर गार्डन आरक्षण टाकणेबाबत एम.आर.टी.पी. कायदा १९६६ चे कलम ३७ (२) अन्वये निर्णय प्रलंबित असणे, धनकवडी येथील सर्व्हे नं.३२ मध्ये ओटा मार्केट चे आरक्षण असल्याने दि स्ट्रीट व्हेंडर्स कायदा-२०१४ नुसार धनकवडी गाव शेवटचा बस स्टॉप येथील बायोमेट्रिक नोंदी झालेल्या एकूण ९० नोंदीपैकी अ, ब, व क वर्गवारीतील ५४ व्यावसायिकांचे पुनर्वसन त्या ठिकाणी करण्यात येणार होते परंतु अद्यापही धनकवडी येथील सर्व्हे न.३२ मध्ये ओटा मार्केट आरक्षणाच्या अनुषंगाने ओटा मार्केट बांधून त्या ठिकाणी फळ व भाजी विक्रेत्यांचे पुनर्वसन करण्यात आले नसणे,

सर्व्हे नं.३२ मधील भाजीपाला विक्रेते व इतर छोटे व्यावसायिकांमध्ये तीव्र असंतोषचे वातावरण असणे, या सर्व प्रलंबित प्रश्नाबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

## मा. मुख्यमंत्री महोदय यांचे निवेदन

सन २०१७ मध्ये पुणे महानगरपालिकेमध्ये आंबेगाव बुद्रुक, आंबेगाव खुर्द, धायरी, शिवणे, उत्तम नगर, लोहगाव, उंड्री, फुरसुंगी, उरुळी देवाची, मुंढवा- केशवनगर, हडपसर साडेसतरा नळी ही ११ गावे समाविष्ठ झाली आहेत. सन २०२१ मध्ये म्हाळूंगे, सुस, बावधान बुद्रुक, किरकिटवाडी, पिसोळी, कोंढवे-धावडे, कोपरे, नांदेड, खडकवासला, मांजरी बुद्रुक, नऱ्हे, होळकरवाडी, औताडे-हांडेवाडी, वडाचीवाडी, शेवाळेवाडी, नांदोशी, सणसनगर, मांगडेवाडी, भिलारेवाडी, गुजर-निंबाळकरवाडी, जांभूळवाडी, कोळेवाडी, वाघोली ही २३ गावे नव्याने समाविष्ट झालेली आहेत.

सदरची गावे पुणे महानगरपालिकेत समाविष्ट झाल्यानंतर पुणे महानगरपालिकेमार्फत पाणीपुरवठा करणेसाठी खालीलप्रमाणे कमी कालावधीची उपाययोजना (Short Term Measures) व जास्त कालावधीची उपाययोजना (Lon Term Measures) हाती घेण्यात आल्या आहेत.

Short Term : यामध्ये पाणीपुरवठा योजना/यंत्रणा ही मुख्यत्वे गावामधील गावठाण व वस्ती भागात पाणीपुरवठा करण्यापूर्ती मर्यादित आहे. सन २०२१-२०२२ च्या अंदाजपत्रकीय अर्थशीर्षकामध्ये नव्याने समाविष्ठ झालेल्या २३ गावांसाठी र. रुपये ५.०० कोटी निधी उपलब्ध झाला आहे. त्यानुषंगाने या गावांसाठी देखभाल दुरुस्ती करीता व टँकर पुरविण्याची निविदा प्रक्रिया राबविण्यात आली असून सदरची कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत. सन २०२२-२३ च्या अंदाजपत्रकीय अर्थशीर्षकामध्ये २३ गावांसाठी टँकर द्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी र. रुपये २.२० कोटी व देखभाल दुरुस्ती करीता र. रुपये ३.३० कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे. सदरची कामे या आर्थिक वर्षात करण्यात येणार आहेत. काही गावांमध्ये आवश्यकतेनुसार सार्वजनिक ठिकाणी सिंटेक्स पद्धतीच्या टाक्या बसविण्याचे काम करण्यात येत असून सदर टाक्या टँकरने भरण्यात येतील ज्यायोगे तेथील नागरिकांना पिण्याचे पाणी उपलब्ध होईल. सद्यस्थितीत सदर २३ गावांमध्ये दररोज सुमारे १२५ टँकर खेपा द्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात येत आहे.

Long Term : पुणे महानगरपालिकेमध्ये नव्याने समाविष्ट ११ व २३ अशा एकूण ३४ गावांमध्ये पाणीपुरवठा योजनेतील डिझाईन, देखरेख, संपूर्ण प्रकल्प व्यवस्थापन करणे या कामासाठी तज्ञ सल्लागार नेमणेकामी पुणे महानगरपालिकेकडून मे. एल.एन. मालविया इंफ्रा प्रोजेक्ट प्रा. लि. यांना कार्यादेश देण्यात आलेले आहेत. मे. एल. एन. मालविया इंफ्रा प्रोजेक्ट प्रा. लि. यांचेमार्फत या संपूर्ण गावात जी. आय. एस. सर्वेक्षण, मॅपिंग, कन्झुमर सर्व्हे, लोकसंख्या निश्चिती इ. कामे झालेली असून सद्यस्थितीत प्रिफीजिबीलिटी रिपोर्ट अंतिम करण्याचे काम चालू असून डीपीआर चे काम प्रगतीपथावर आहे. सदर डीपीआर नुसार कामे हाती घेण्यासाठी र. रुपये १५० कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत एकत्रित पाण्याचा स्त्रोत उपलब्ध नसल्याने टप्प्याटप्प्याने पाणीपुरवठा प्रकल्प करण्याचे नियोजन करण्यात येत आहे. त्यानुसार प्रथम सुस म्हाळुंगे व बावधन बु या गावांसाठी योजना तयार करण्यात आली असून त्याची निविदा प्रक्रिया सुरु आहे. पुढील टप्प्यांत वाघोली व लोहगाव या गावांसाठी पाणीपुरवठा योजना तयार करण्यात येत आहे.

पुणे महानगरपालिकेमध्ये समाविष्ट झालेल्या गावांमधील निर्माण होणारा अंदाजे ४०० मे. टन. प्रतिदिन कचरा कुठेही ओपन डम्पिंग न करता या सर्व कचऱ्याची पुणे महानगरपालिकेच्या मालकीच्या कचरा प्रक्रिया प्रकल्पामध्ये शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्यात येत आहे. यासाठी अंदाजे ८ कोटी वार्षिक खर्च येत आहे. तसेच सदर कचरा संकलन व वाहतुक करणे करिता सुमारे २०० वाहने दैनंदिन कार्यरत असून या पोटी वार्षिक खर्च

र. रु. २६ कोटी होत आहे. या व्यतिरिक्त आदर पुणावाला क्लीनसिटी ईनिशिटीव्ह अंतर्गत १२ वाहने कचरा संकलनाकरीता कार्यरत आहे.

नव्याने सामाविष्ट ११ गावांमध्ये १८२ कि.मी. लांबीची मलवाहिनी विकसित करण्यात ग्रेणार असून मुंढवा केशवनगर, सर्वे नं.९ ते १२ मध्ये (१२ MLD क्षमता) व मांजरी बु।। सर्वे नं. २८ (९३.५ MLD क्षमता) या दोन ठिकाणी मैलापाणी शुद्धीकरण केंद्र बांधण्यात येणार आहे.

प्रस्तुत योजनेसाठी सन २०२२-२३ मधील अंदाजपत्रकात रक्कम रु.१००.०० कोटी इतकी तरतूद उपलब्ध झाली आहे. जागेवर काही ठिकाणी सर्वेक्षणाचे काम करण्यात आलेले असून लोहगाव, धायरी, मुंढवा-केशवनगर, आंबेगाव बु., मांजरी येथे प्रत्यक्ष्यात मलवाहिनी टाकणेची कामे सुरू करण्यात आलेली आहेत. तसेच मुढवा केशवनगर येथील मैलापाणी शुद्धीकरण केंद्राची जागा ताब्यात आलेली असून मांजरी बु. येथील मैलापाणी शुद्धीकरण केंद्राची जागा ताब्यात घेण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे. महानगरपालिकेने नव्याने सामाविष्ट १९ गावांसाठी मलनि:सारण व्यवस्थेचा मास्टर प्लॅन तयार करणे या कामासाठी तज्ञ सल्लागार मे. प्रायमुव्ह इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कन्सल्टंट प्रा. लि. यांची नेमणूक केली होती. या नव्याने सामाविष्ट गावांच्या सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये रक्कम रु.३९२.९५ कोटीची कामे प्रस्तावीत केलेली आहे.

सन २०१७ मध्ये पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये ११ व सन २०२१ मध्ये २३ गावांचा समावेश झालेला असून सदर गावांमध्ये रस्त्याची कामे प्रतिवर्षी आर्थिक तरतुदीनुसार पुणे महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहेत. सदर गावांमध्ये काही मुख्य रस्ते विकसित असून प्रतिवर्षी पुणे महानगरपालिकेमार्फत रस्त्यांची देखभाल दुरुस्तीची कामे करण्यात येतात.

पुणे महानगरपालिकेच्या नव्याने समाविष्ट झालेल्या ३४ गावांमध्ये २९ ठिकाणी नवीन आरोग्यवर्धिनी केंद्रे मंजूर करण्यात आलेली आहेत. यापैकी केंद्र शासनाच्या निकषानुसार १६ गावांमध्ये जागा उपलब्ध झाली असून पुढील कार्यवाही चालू आहे. उर्वरित ठिकाणी जागा मिळविणेसाठी पाठपुरावा सुरु आहे.

ग्रापंचायत मधून महानगरपालिकेत गावे समाविष्ट होताना ग्रामपंचायतीतील ८ ड ला नोंदणी असलेल्या अधिकृत मिळकतींची आकारणी महानगरपालिकेत सामाविष्ट होताना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १२९ नुसार करण्यात येते.

"ज्या सालचे घर त्या सालचे दर" ह्या प्रमाणे आकारणी दर विचारात घेऊन करपात्र रक्कम निच्छित करण्यात येते.

ज्या मिळकतीची ८ ड ला नोंद नाही अश्या अनधिकृत बिगरनिवासी मिळकतीची आकारणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २६७ अ नुसार इमारतीवर बसवण्यायोग्य असलेल्या मालमत्ता कराच्या दुप्पटी इतकी शास्ती आकारणी केली जात आहे. (निवासी मिळकतीना १००० चौ फूट पर्यंत दंड आकारणी केली जात नाही तसेच १००० चौ फुटापेक्षा अधिक निवासी मिळकतीना दिड पटीने आकारणी केली जाते.)

११ गावामधील मौजे फुरसुंगी व देवाची उरळी ही गावे पुणे महानगरपालिकेतून वगळण्याचे काम शासनाच्या विचारधीन आहे. पुणे मनपा मार्फत मान्य आराखड्यानुसार मौजे फुरसुंगी व देवाची उरळी या ठिकाणी प्रत्यक्ष जागेवर अद्याप कोणतेही काम सुरु केलेले नाही.

दि.०४/१०/२०१७ च्या अधिसूचनेन्वये पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये ११ गावे समाविष्ट करण्यात आली आहेत. म.प्रा.नि.व.न.र. अधिनियम, १९६६ चे कलम २३ नुसार सदर ११ गावांसाठीची विकास योजना तयार करण्याचा इरादा महापालिकेने जाहिर केला असून कलम २४ अन्वये नगर रचना अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच कलम २५ नुसार विद्यमान जमीन वापर आराखडा तयार करण्यात आला असून प्रस्तावित जमीन वापर नकाशा तयार करण्याचे काम महापालिकेच्यास्तरावर सुरु आहे.

दि. ३०/०६/२०२१ च्या अधिसूचनेन्वये २३ गावांचा समावेश पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये करण्यात आला असून या गावांकरिता उक्त अधिनियमाच्या कलम ४० नुसार या २३ गावांकरिता विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची नियुक्ती करण्यात आली आहे. सदर गावांची विकास योजना प्राधिकरणाने कलम २६ अन्वये प्रसिद्ध केली असून त्याबाबतची वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन सदर विकास योजना शासनास मंजूरीसाठी सदर केल्यानंतर कलम ३१ अन्वये सदर विकास योजनेस मंजूरी देण्याची कार्यवाही शासनस्तरावरुन करण्यात येईल. सदर विकास योजनेस अंतिम मान्यता मिळाल्यानंतर त्यामधील आरक्षणे ताब्यात घेण्याची कार्यवाही महापालिकेमार्फत करण्यात येईल.

पुणे पेठ धनकवडी स.नं. २९/१/२/४ चैतन्यनगर या जागेवर दि. ०३/०६/१९६७ रोजी जिल्हाधिकारी, पुणे यांनी लेआऊट मान्य केला होता. त्यानंतर दि.०७/०२/१९७२ रोजीच्या आदेशान्वये त्यांनी सदर लेआऊट रद्द केला आहे. या लेआऊटमधील ओपन स्पेस (८००० चौ. मी.) उद्यानाकरिता आरक्षित करण्याकरिता परिसरातील नागरिकांनी मा. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या रिट याचिका क्र.११८४८/२०१३ मधील दि. ०९/०९/२०१५ रोजीच्या निकालानुसार विषयांकित जागेवर उद्यान आरक्षित करणेकरिता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) अन्वयेची कार्यवाही करण्याचे आदेश पुणे महानगरपालिकेस दिलेले आहेत. त्यास अनुसरुन सदर प्रस्तावास अधिनियमाचे कलम ३७ (२) अन्वये शासनाची अंतिम मान्यता मिळणेकरिता सदर प्रकरणी पुणे महानगरपालिकेने वैधानिकः कार्यवाही करुन दि.१९/०५/२०१६ रोजीच्या पत्रान्वये प्रस्ताव शासनास सादर केलेला आहे.

पुणे महानगरपालिकेने सादर केलेल्या फेरबदल प्रस्तावात, फेरबदलाखालील जागेबाबत मालकी हक्काचे ७/१२ उतारा, त्यामध्ये नमूद व्यक्तींना तसेच इतर संबंधितांना महानगरपालिकेने नोटीस देऊन सुनावणी दिली नसल्याचे दिसून येत असल्याने वैधानिक कार्यवाही पूर्ण झाली असल्याची खातरजमा करणेकरिता शासनाने पुणे महानगरपालिकेकडून काही माहिती/कागदपत्रे/नकाशे दि.१०/०१/२०२० रोजीच्या पत्रान्वये मागविण्यात आलेली आहे. या अनुषंगाने पुणे महागनरपालिकेने दि.२०/०३/२०२० रोजीच्या पत्रान्वये कळविलेली माहिती शासनास दि.१०/०९/२०२० रोजी प्राप्त आहे. या अनुषंगाने सदर प्रस्ताव छाननी स्तरावर असून त्यावरील अंतिम निर्णय शासनस्तरावर विचाराधीन आहे.

**********

लक्षवेधी सूचना

गृह विभाग

# महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२२ चे हिवाळी अधिवेशन

श्री. दिलीप लांडे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.४१५ पुढीलप्रमाणे आहे -:

"साकीनाका ,मुंबई येथील हॉटेल पेनि-सुला मध्ये खुलेआम अंमली पदार्थाचे सेवन करण्यात येत असल्याची बाब माहे नोव्हेंबर,२०२२ च्या तिस-या आठवडयात वा त्या दरम्यान उघडकीस आलेली असणे, हॉटेल पेनिन्सुला मधील पब रात्रभर बेकायदेशीरपणे सुरु ठेवला जात असणे, या पबमध्ये तरुण-तरुणी येत असून ते अंमली पदार्थाचे सेवन करुन नशेतच नृत्यअविष्कार करत असणे, तरुण पीढी मोठया प्रमाणात व्यसनाधीन होत असून कायदा व सुव्यस्थेचा प्रश्न निर्माण झालेला असणे, या पबला स्थानिक पोलीसांचे संरक्षण असून आर्थिक देवाण-घेवाण होत असल्याने पोलीस कोणतीही कारवाई करीत नसणे, सदर हॉटेल निवासी भागात असल्याने रात्रीच्या पबमध्येक वाजणा-या गाणांच्या कर्णकर्कश आवाजामुळे स्थानिक नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत असणे, परिणामी स्थानिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची भावना, हॉटेल पेनिन्सुलामध्ये चालणा-या बेकायदेशीर पबवर तातडीने कार्यवाही करण्याची होत असलेली मागणी, या मागणीच्या अनुषंगाने शासनाने करावयाची कारवाई व याबाबतची शासनाची भूमिका."

---

## मा. उप मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

बृहन्मुंबई पोलिस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात साकीनाका पोलिस स्टेशन हद्दीत मे.गौतम हॉस्पिटीलॅटी प्रा.लि. पेनिनसुला ग्रॅण्ड हॉटेल या आस्थापनेत ओपा व कल्ट हे दोन परवाना प्राप्त डिस्कोथेक असून, मित्रौ बार आहे. सदर आस्थापनेची पोलिस प्रशासनाकडून वेळोवळी तपासणी करण्यात येत असून, तपासणी दरम्यान नमूद आस्थापनेत आलेले तरुण तरुणी कोणत्याही अमली पदार्थाचे विक्री वा सेवन करत असल्याचे आढळून आलेले नाही. सदरहू आस्थापनेला भारत सरकारच्या पर्यटन मंत्रालयाने चार तारांकित दर्जा दिलेला आहे. त्याबाबत शासनाने निर्धारित केलेल्या विहीत वेळेत सदरहू डिस्कोथेक ( पहाटे ३.०० वाजेपर्यंत ) व बार ( रात्रौ ०१.३० वाजेपर्यंत ) चालू ठेवण्यात येतात. तसेच, सदर आस्थापनेस कोणत्याही प्रकारचे पोलिस संरक्षण देण्यात आलेले नाही.

सदर आस्थापनेतील डिस्कोथेकमध्ये वारंवार पोलिस पथकामार्फत ध्वनीमापक यंत्राद्वारे आवाजाची तिव्रतेची पडताळणी करण्यात येत असून, आवाजाची तीव्रता अधिंक आढळून आल्यास किंवा नियमांचे उल्लंघन केल्यास योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येते. सदर आस्थापनेच्या किचन रुममधील शेगडीच्या पेटत्या निखाऱ्यामुळे आस्थापनेत आग लागून मानवी जिवीत धोक्यात येईल असे कृत्य केल्याने व कोरोना साथ रोगाच्या कालावधीत शासनाच्या आदेशाचे उल्लंघन केल्याचे आढळून आल्याने, साकीनाका पोलिस स्टेशन येथे गु.र.क्र. ११९८/२०२०, दिनांक ०१/११/२०२०, भा.दं.वि. कलम १८८, २८५, २६९, ३३६, ३४ सह राष्ट्रीय आपत्ती कायदा कलम ५१ ब सह साथीचा रोग अधिनियम कलम ३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून, सद्यस्थितीत गुन्ह्याचा तपास सुरु आहे. तसेच, सदरहू आस्थापने विरुद्ध दिनांक १४/०८/२०२२ रोजी महाराष्ट्र पोलिस कायदा कलम ३३ (डब्लू), १८१ अन्वये कारवाई करण्यात येऊन आकारण्यात आलेल्या रु १२,५००/- इतक्या दंडाची रक्कम मा.न्यायालयात जमा करण्यात आलेली आहे.

रोख H/1162-1(750-2-23)

# लक्षवेधी सूचना क्र. २०१५
# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२२ चे तिसरे (हिवाळी) अधिवेशन

महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ (३) अन्वये श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले, मा. विधानसभा सदस्य यांनी उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. २०१५ पुढील प्रमाणे:-

" सातारा तालुक्यातील उरमोडी पाटबंधारे प्रकल्पांतर्गत असलेल्या लावघर उपसा सिंचन योजनेचे कामास मान्यता मिळणे आवश्यक असणे, सातारा मतदार संघातील उरमोडी पाटबंधारे प्रकल्पातर्गत सातारा, खटाव व गाण या तालुक्याचा समावेश आहे. शासनाच्या नविन धोरणानुसार सातारा तालुक्यातील शेतक-यांची जमिनीची धारण क्षमता कमी असल्याने व जमिनीचे दर जास्त असल्याने सातारा तालुक्यातील संपूर्ण सिंचन क्षेत्र हे बंदिस्त पाईप लाईने करण्याचे प्रस्तावित केले आहे. त्याचे सर्वेक्षणाचे कामही प्रगतीपथावर आहे. यामुळे सातारा तालुक्याच्या हिश्याचे सुमारे ०.५० टी. एम. सी. पाणी वाचणार असल्याने या वाचणा-या पाण्यामधून लावघर उपसा सिंचन योजना निर्माण करण्यात आली येणे, लावंघर भाग हा उरमोडी धरणाजवळ आहे. त्या भागास इतर कोणत्याही पर्यायाने पाणी देणे शक्य नसल्याने लावघर उपसा सिंचन योजना तयार करण्यात येणे, तरी सदर योजनेचे कामास मान्यता मिळून तातडीने सुरू होणे संदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

..............................................................................................................

### श्री. देवेंद्र फडणवीस मा. उपमुख्यमंत्री (जलसंपदा विभाग) यांचे निवेदन

उरमोडी धरणाचे पाणी कण्हेर जोड कालव्याव्दारे बोगद्यामधून कण्हेर डाव्या कालव्यामध्ये घेवून तेथून पुढे आरफळ कालवा कि.मी. ४५ येथून उरमोडी उपसा योजनेअंतर्गत वाठार किरोली व कोंबडवाडी येथे दोन टप्प्यात १३८.४७ मी. उचलून खटाव व माण तालुक्यातील दुष्काळी भागास सिंचन सुविधा पुरविणे प्रस्तावित आहे. विषयांकीत लावंघर उपसा सिंचन योजनेचा उद्भव कण्हेर जोड कालवा सा.क्र. ०/६०० मी. येथून प्रस्तावित असून तेथून अंदाजे १४५ मी. उंची पर्यंत पाणी उचलावे लागणार आहे. नियोजित लावंघर उपसा सिंचन योजनेमध्ये लावंघर, म्हसकरवाडी, शिंदेवाडी, कंरजे, करूण व अंबवडे असे एकुण ६ गावांचे ३५५.०० हे क्षेत्र सिंचनाखाली प्रस्तावित आहे.त्याकरीता प्रस्तावित कालवा व वितरण व्यवस्था ही बंदिस्त पाईपलाईनद्वारे करणे नियोजित असल्याने ३५५ हे. या क्षेत्रासाठी साधारणपणे १.७५ द.ल.घ.मी. इतक्या पाण्याची आवश्यकता आहे.

उरमोडी डावा प्रवाही खुल्या खोदकामातील कालव्यामुळे सिंचनाखाली येणाऱ्या ८८० हे. क्षेत्रासाठी ६.०० दलघमी इतक्या पाण्याची आवश्यकता होती. सदर कालवा खुला खोदाईद्वारे (कि.मी १ ते १०) व त्यापुढील कालवा व त्यावरील वितरणव्यवस्था बंदिस्त पाईपलाईनद्वारे केल्यामुळे ७६५ हे. क्षेत्र सिंचनाखाली येत असून त्यासाठी ४.७८ दलघमी इतक्या पाण्याची आवश्यकता आहे. शेंद्रे येथील अजिंक्यतारा सहकारी साखर कारखाना, सूतगिरणी या उद्योगांच्या वाढलेल्या नागरीकरणामुळे तसेच राष्ट्रीय महामार्गालगत वाढलेल्या औद्योगीकरणामुळे सिंचन क्षेत्र कमी होत

शेटा H/1181 (750-3-23) ८छु.गो.पु.

आहे. त्यामुळे (८८०-७६५) ११५ हे इतके सिंचन क्षेत्र कमी होत असून, एकूण ७६५ हे. सिंचन क्षेत्रासाठी (ICA) पाण्याचा वापर होऊन देखील १.२२ दलघमी इतक्या पाण्याची बचत संभवितआहे.

उरमोडी उजवा प्रवाही उघड्या कालव्यामुळे सिंचनाखाली येणाऱ्या ३८८९ हे. क्षेत्रासाठी २६.५४ द.ल.घ.मी. इतक्या पाण्याची आवश्यकता आहे. सदर कालवा खुला खोदाईद्वारे कि.मी १ ते १० व त्यापुढील कालवा व त्या वरील वितरण व्यवस्था बंदिस्त पाईपलाईनद्वारे केल्यामुळे ४१२२ हे. क्षेत्र सिंचनाखाली येत असून त्यासाठी २४.५४ द.ल.घ.मी. इतक्या पाण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे (४१२२- ३८८९) २३३ हे. इतक्या वाढीव सिंचन क्षेत्रास (ICA) पाण्याचा वापर होऊन देखील २.०० द.ल.घ.मी. इतक्या पाण्याची बचत संभवित आहे.

वरील दोन कालवे व त्यावरील वितरण व्यवस्था बंदिस्त पाईपलाईनद्वारे करणेचे नियोजित असल्याने डावा कालवा-१.२२ द.ल.घ.मी व उजवा कालवा-२.०० द.ल.घ.मी. अशी एकूण ३.२२ द.ल.घ.मी. इतकी पाणी बचत संभवित आहे. शासन निर्णय दिनांक ०२/०२/२०१७ मधील तरतूदीनूसार बचत झालेल्या पाण्यातून मुळ घोषित लाभक्षेत्रात निर्माण झालेली CCA व ICA मधील तफावत दूर करून शक्य झाल्यास लाभक्षेत्राबाहेरील क्षेत्राला पाणी देण्याबाबत पडताळणी करण्यात येत आहे.

***************

लक्षवेधी सूचना क्र.७७८

## सन २०२२ चे चतुर्थ (हिवाळी) अधिवेशन

**श्री. राजेश पवार, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"नांदेड जिल्ह्यात वाळू व अन्य गौणखनिजाची वाहतूक करणा-या वाहनांना जीपीएस बसविणे आवश्यक असताना सदर नियमांची पायमल्ली करत दररोज शेकडो वाहनांद्वारे गौणखनिजाची वाहतूक केली जात असल्याचे नोव्हेंबर २०२२ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास येणे, सकाळपासून ते संध्याकाळपर्यंत शेकडो हायवा आणि टीप्परचा वावर शहरातून मोठ्या प्रमाणावर होत असणे, वाहनांना जीपीएस बसविण्याच्या नियमातून नांदेड जिल्ह्याला सुट दिल्याचे चित्र निर्माण झाले असणे, त्यामुळे उक्त प्रकरणी चौकशी करण्याची गरज, त्यानुषंगाने सदरहू वाहनांवर तातडीने जीपीएस बसवून अवैध वाहतूक रोखण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन**

नांदेड जिल्हयात तसेच प्रामुख्याने शहरातील अवैध गौण खनिजासाठी वाहतूक करणाऱ्या वाहनांची वाहतूक रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी मोठी वाहणे (हायवा), ट्रक, टिप्पर, जेसीबी मशीन व गौणखनिज उत्खनन करणारी इतर वाहने अशा सर्व वाहनांवर संबंधीताना GPS लावणे बंधनकारक करण्याबाबत जिल्हाधिकारी, नांदेड यांनी दिनांक १७.०६.२०२१ रोजी आदेश दिले आहेत. सदर आदेशाची त्वरित अमंलबजावणी करण्यास व वाहनांना GPS लावणेची कार्यवाही करणेबाबत प्रादेशिक परिवहन अधिकारी, नांदेड यांना जिल्हाधिकारी, नांदेड यांनी दिनांक १७.१०.२०२२ च्या पत्रान्वये सुचना दिल्या आहेत. सन २०१८ ते माहे नोव्हेंबर, २०२२ अखेर ट्रक, टिप्पर अशा नोंदणी केलेल्या ८१७ वाहनाना GPS बसविण्यात आले आहे.

दिनांक २७.११.२०२२ रोजी दैनिक प्रजावणीमध्ये जीपीएस नसलेल्या शेकडो वाहनाव्दारे खनिज वाहतूक या मथळयाची बातमी प्रसिध्द झाली. त्यानुषंगाने गौण खनिजाची अवैध उत्खनन व अवैध वाहतूक रोखण्याकरीता गौण खनिजाचे वाहतूक करणाऱ्या वाहनावर GPS व्दारे Real Time monitoring करण्याकरीता गौण खनिजाचे वाहतूक करणाऱ्या वाहनांवर AIS १४० IRNSS प्रमाणे असलेले GPS Devise वसविण्याबाबत जिल्हाधिकारी, नांदेड यांच्याकडून सूचना देण्यात आल्या आहेत.

नांदेड जिल्हयात दिनांक ०१.०४.२०२२ ते दिनांक ३०.११.२०२२ या कालावधीत अवैध उत्खनन वाहतुकीच्या १८२ प्रकरणात २१५.८४ लक्ष एवढी दंडात्मक रक्कम वसुल करण्यात येऊन ०८ गुन्हे व १७ यंत्रसामग्री जप्त करण्यात आली आहे.

गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी नांदेड जिल्हात जिल्हा स्तरावर उपविभागीय अधिकारी व तहसिलदार स्तरावर भरारी व बैठे पथके तयार करण्यात आली आहेत.

********************

लक्षवेधी सूचना क्र.१२३७

सन २०२२ चे चतुर्थ (हिवाळी) अधिवेशन

श्री. रवि राणा, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"अवैध बोअर ब्लास्टिंगमुळे मौजे मासोद, परसोडा तालुका अमरावती जिल्हा अमरावती या परिसरामध्ये खदानीमध्ये ब्लास्टिंग केल्यामुळे त्या परिसरातील जमिनीतल्या विहिरीच्या पाण्याची पातळी खोल जात असून. किंव्हा विहिरी आटत असुन त्यांच्या शेतातील पिके सुकत असणें ज्या मुळे रोजगाराविषयी प्रश्न निर्माण झाला असणे. राहत्या घराला तडे गेले असून अनेक विषय किस्ट झालेले असणे त्या संदर्भात तेथील गावकऱ्यांनी माननीय जिल्ह्याचे पालकमंत्री व उपमुख्यमंत्री यांना दिनांक १०.११.२०२२ रोजी त्यांची भेट घेऊन त्यांना याविषयी तक्रार दिली असणे त्यानंतर तक्रारीची शहानिशा करत जिल्हाधिकारी यांनी यासंदर्भात तातडीची कारवाई करण्याबाबतचे निर्देश असणें तरीही अद्याप त्या ठिकाणी बोर ब्लास्टिंग थांबले नसणे त्यामुळे त्यांच्या निवेदनाची दखल न घेतल्यामुळे शेतकरी, शेतमजूर चिडले असून त्यांनी जिल्हाधिकारी अमरावती यांना दिनांक १९--२०२२ पासून अवैद्य बोअर ब्लास्टिंग बंद करणे या कामी आमरण उपोषणाला बसत असल्याची लेखी निवेदन दिले असून त्याचे निवेदन संबंधित जिल्हाधिकारी कार्यालय येथे दिलेले असणे शासनाने दखल घेऊन तातडीने बोर ब्लास्टिंग बंद करून यासंबंधी ज्या ज्या खदानी आहे त्याची चौकशी करून खदानी मध्ये अवैध उत्खनन केलेला गौण खनिज स्टॉक करून ठेवलेला आहे त्याची चौकशी करून चोरी ने महसूल बुडविला महसूल बुडविला प्रकरणी संबंधित मालक यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्याची मागणी केलेली आहे असणे. वरीप्रमाणे नागरिक प्रशांत चांभारे, मिलिंद अवघड, होले, दिलीप बाभुळकर, अजय गवळी, निलेश खंडारे, गजानन म्हलले, किरिर्श्रा राठोड आदींनी जिल्हाधिकारी अमरावती यांना दिलेल्या गंभीर निवेदनावर शासनाने वेळीच दखल घेण्याची आवश्यकता व शासनाने करावयाची कार्यवाही."

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, मा.मंत्री (महसूल) यांचे निवेदन

अवैध बोअर ब्लास्टिंगमुळे मौजे मासोद, परसोडा तालुका अमरावती जिल्हा अमरावती या परिसरामध्ये खदानीमध्ये ब्लास्टिंग केल्यामुळे त्या परिसरातील जमिनीतल्या विहिरीच्या पाण्याची पातळी खोल जात असून. किंवा विहिरी आटत असुन त्यांच्या शेतातील पिके सुकत असणे ज्या मुळे रोजगाराविषयी प्रश्न निर्माण झाला असणे. राहत्या घराला तडे गेले असून अनेक विषय क्लिस्ट झालेले असणे त्या संदर्भात तेथील गावकऱ्यांनी माननीय जिल्ह्याचे पालकमंत्री व उपमुख्यमंत्री यांना दिनांक १०.११.२०२२ रोजी त्यांची भेट घेऊन त्यांना देण्यात आलेली तक्रार विभागास प्राप्त झालेली नाही. परंतु, निलेश चौरासिया यांनी स्टोन इंडस्ट्रिज परसोडा येथील गट नं.४३,२०,२२ व १२ मध्ये विना परवाना व अग्रिम स्वामित्वधनाचा भरणा न करता केलेल्या

१९४५०.६५ ब्रास गौण खनिजाची साठवणूक (स्टॉक) अवैध स्फोटक रासायनिक पदार्थ (जिलेटीन कांड्या) सापडल्या त्यांच्यावर गुन्हा दाखल करून जिल्हाधिकारी कार्यालयाने दंड ठोठावला आहे. तरी पण शासनाच्या कोणत्याच यंत्रणेला न जुमानता ते अवैध संपत्ती, सावकारी, बेनामी कॅश यांचा धंदा करून क्रशर कायमस्वरूपी बंद करावे तसेच त्यांना अटक करून चौकशी करण्याबाबत या विषयाचे विधानसभा सदस्य यांनी मा.उप मुख्यमंत्री दिलेले निवेदन विभागास प्राप्त झालेले आहे.

यापूर्वी मौजे मासोद व मौजे परसोडा ता.जि. अमरावती येथील खदानीमध्ये मोठ्या क्षमतेचे विस्फोटक वापरून ब्लास्टींग करण्यात येत असून सदर विस्फोटकाच्या हाद-यामुळे मौजे मासोद व परसोडा येथील घरांना जबर धक्का बसत असून घरांना भेगा पडत आहेत, तसेच सदर भागातील पाण्याची पातळी खाली जात आहे, अशा आशयाच्या तक्रारी स्थानिक लोकप्रतिनिधी व नागरीकांनी जिल्हाधिकारी, अमरावती यांच्याकडे सादर केल्या आहेत.

त्यानुषंगाने उपविभागीय दंडाधिकारी, अमरावती व तहसिलदार, अमरावती यांना जिल्हाधिकारी यांनी चौकशी करण्याबाबत सूचना देण्यात आल्या होत्या. तद्नंतर, जिल्हाधिकारी यांनी सदर तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करीता अपर जिल्हादंडाधिकारी अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०८.११.२०२१ रोजी संयुक्त समिती स्थापन करण्यात आली. सदर समितीने मौजा परसोडा व मौजा मासोद येथील खाणपट्याची पाहणी करुन जिल्हाधिकारी अमरावती यांना दिनांक १७.१२.२०२१ रोजी अहवाल सादर केला. सदर अहवाल जिल्हाधिकारी, अमरावती यांनी दिनांक २०.१२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये अपर जिल्हा दंडाधिकारी, अमरावती, वरीष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण अमरावती, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, अमरावती, जिल्हा खनिकर्म अधिकारी, अमरावती, पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांना त्यांच्या विभागाशी संबंधित मुद्यांवर कारवाई करण्याबाबत कळविले.

तसेच ब्लास्टींग संदर्भातील तक्रारीच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्याकरिता जिल्हाधिकारी, अमरावती यांनी दिनांक २१.१२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये नागपूर येथील संचालक, खाण व सुरक्षा निर्देशक, नागपूर या कार्यालयास कळविले होते. त्यानुसार संचालक खाण व सुरक्षा निदेशालय नागपूर व संबधीत अधिकारी यांनी वेळोवेळी केलेल्या पाहणी व तपासणी दरम्यान आढळलेल्या त्रुटींचे अनुषंगाने १४ खाणपट्टयांना Violation Notice बजावून खाणपट्टयातील खाणकामे पुढील अनुपालना पर्यंत थांबवलेली आहेत. खाण व सुरक्षा निदेशालय नागपूर क्षेत्र संख्या-१ यांनी Impact of deep hole blasting conduct at stone mines located in Masod and Parsoda villages, Amravati tehsil of Amravati याविषयाबाबत अमरावती खदानधारक व खाण व सुरक्षा निदेशक नागपूर यांच्या समवेत दिनांक ०७.१०.२०२२ रोजी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आलेल्या सभेच्या आयोजनामध्ये Jock Hammer किंवा Short Hole चा वापर करुन दगड फोड करण्याचे प्रक्रियेमध्ये दगड कणांव्दारे Silcosis हा आजार संभवत असल्याने, Deep hole blasting ही पध्दत अधिक सुरकक्षित आहे. त्यानुषंगाने

खाणपट्टाधारक यांना काही तांत्रीक अडचण असल्यास खाण व सुरक्षा निदेशक नागपूर यांच्याकडून मार्गदर्शन करण्यात येणार असल्याचे नमूद केले.

मौजा परसोडा येथील खाणपट्टा धारक श्री. चौरसीया यांनी मौजा परसोडा येथील गट नं. ४३, २०, २२ व १२ मध्ये साठवणूक केलेल्या गौण खनिजाची ETS मोजनी केली असता १९४५०.६५ ब्रास गौण खनिजाचे साठवणूक केल्याचे आढळून आल्याने त्यांना रुपये १२,९७,७४,७३७/- इतक्या रक्कमचे नोटीस बजावण्यात आले असता त्यांनी मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर येथे रिट याचिका क्रमांक ५२०५/२०२२ दाखल करण्यात आले असता मा. न्यायालयाने दिनांक २०.०९.२०२२ रोजीच्या आदेशान्वये जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या नोटीशीस स्थगिती दिली असून सद्यस्थित प्रस्तुत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

तसेच मौजे मासौद व परसोडा येथील दगडखाणीच्या अनुषंगाने श्री. प्रशांत दादाराव चांभारे व इतर यांनी मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर येथे जनहित याचिका क्रमांक १३/२०२२ दाखल केली सदर याचिकेत मा. न्यायालयाने Director General of mines safety यांच्याकडून Action Taken Report घेऊन सदर याचिका खारीज केली.

तसेच मौजे मासोद येथील नागरिकांनी अवैध बोअर ब्लास्टींग बंद करण्याबाबत जिल्हाधिकारी अमरावती यांना दिनांक २१.११.२०२२ रोजी अमरण उपोषण करण्याबाबत निवेदन दिले असून सदर मागणीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी अमरावती यांच्या कार्यालया समोर दिनांक १९.१२.२०२२ रोजी पासून उपोषण सुरु केले असून, आमरण उपोषण मागे घेण्याबाबत संबंधितास जिल्हाधिकारी, अमरावती यांनी दिनांक २७.१२.२०२२ घेण्याबाबत कळविले आहे. उपोषणकर्ता यांच्या निवेदनातील बाबींवर दिनांक ०७.१२.२०२२ रोजीच्या बैठकीत उपोषण सुरु करण्यापूर्वीच जिल्हाधिकारी अमरावती यांच्याकडून चर्चा करण्यात आली आहे.

**************

२२९

१७७८

# महाराष्ट्र विधानसभा

## सन-२०२२ चे चतुर्थ (हिवाळी ) अधिवेशन

**श्री. शांताराम मोरे,श्री. विश्वनाथ भोईर, श्री. श्रीनिवास वनगा,मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ (१) अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १७७८**

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पालघर व ठाणे जिल्हा येथील विकास कामे पूर्ण करताना अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा दहा टक्के किंवा त्यापेक्षा कमी दरात प्राप्त निवेदत मोठ्या प्रमाणात कामांवर बचत होणे,परिणामी अशी कामे पूर्ण होऊन प्रशासकीय मान्यता प्राप्त व्याप्तीतील आर्थिक बचत शिल्लक राहणे, अशा बचतीतून त्याच कामांशी निगडित व मंजूर काम समाविष्ट असलेल्या अथवा सलगच्या काम रस्त्यांची लांबी,रुंदी वाढविणे,लहान पुलांची कामे करणे, बाबतचे सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण २०१८ / प्र.क्र.९६/ इमा-२ दिनांक ०३ ऑगस्ट,२०१८ नुसार ई- निविदेच्या रकमेच्या अधीन राहून कमी किमतीच्या निविदेमध्ये अशा प्राप्त निविदामधून कंत्राटदार निविदेतील दरात काम करण्यास तयार असल्यास जास्त/कमी करून घेण्यास निर्बंध असणे, या अनुषंगाने निविदेच्या रकमेच्या अधीन राहून प्राप्त निविदा बाबींमध्ये पाच टक्के इतके कमी/ जास्त व्हेरिएशन (Veriation) मंजूर करण्यास मुख्य अभियंता यांना प्राधिकृत केलेले असणे,तथापि ठाणे व पालघर या जिल्ह्यांमध्ये सदरची रक्कम ५% पेक्षा अधिक खर्च केलेली असणे, संबंधित विभागाचे अधिकारी व ठेकेदार यांचे संगनमतांने सुरू असणे, सबब शासनाची दिशाभूल/ फसवणूक वा अपहार करत असणे, या दोन्ही जिल्ह्यांमध्ये ई-निविदा २५ ते ३१ टक्के पर्यंत कमी किमतीच्या निविदा प्राप्त होत असणे, प्रत्यक्षात पाच टक्के पेक्षा अधिक रक्कम ठेकेदारास अदा केलेली असणे, हि बाब माहे डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात उघडकीस येणे, अशा सर्व कामांची एस.आय.टी. मार्फत चौकशी करने व नियमापेक्षा अधिक रक्कम दिलेल्या ठेकेदार व जबाबदार अधिकारी यांच्याकडून वसुली करणे अशा अनेक गैरव्यवहारामुळे स्थानिक जनतेमध्ये पसरलेल्या असंतोष व संतापाची भावना वाढीस लागणे, जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करून त्वरित निलंबित करण्याबाबत शासनाने करावयाची कारवाई व याबाबत शासनाची भूमिका.'

**मा. श्री.रविंद्र चव्हाण, मंत्री, सार्वजनिक बांधकाम विभाग (सार्वजनिक उपक्रम वगळून) यांचे निवेदन**

पालघर व ठाणे जिल्हयातील कामा करीता प्रशासकीय मान्यता प्राप्त अंदाजपत्रकातील रकमेपेक्षा कमी दराची निवीदा प्राप्त झाल्यास, करारनाम्यातील तरतुदी नुसार काम कार्यान्वीत करुन पुर्ण केल्यानंतर अशा कामांमध्ये बचत झाली असल्यास सा.बां.विभागाचे शासन निर्णय क्र.सीएटी/२०१७/प्र.क्र.०८/इमा-२, दि.२७ सप्टेंबर २०१८ व शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.९६/इमा-२, दि. ०३ ऑगस्ट २०१८ व क्र.सीएटी/२०१७/प्र.क्र.८/इमा-२, दि. २२ ऑक्टोबर २०१८ मध्ये निर्गमीत केलेल्या सुचनेनुसार कार्यवाही करण्यात येते.

******************************

रोटा - H - 0098 (750-4-23)